# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 March 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १९ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार;महाराष्ट्रातल्या पाच मतदारसंघांचा समावेश.
- राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षनाव आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणीला प्रारंभ.
- भाडोत्री हिंदुत्व मान्य नसल्याची माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची टीका.
- बनावट चकमक प्रकरणी माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना जन्मठेप.

आणि

- वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ११ हजार स्नातकांना पदवी प्रदान.

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला १७ राज्य आणि चार केंद्रशासित प्रदेशातल्या १०२ जागांसाठी मतदान होणार आहे, यामध्ये महाराष्ट्रातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांचा समावेश आहे. याशिवाय तामिळनाडुमधल्या ३९, राजस्थान १२, उत्तर प्रदेश आठ, मध्य प्रदेश सहा, उत्तराखंड आणि आसाममधल्या प्रत्येकी पाच, बिहार चार, पश्चिम बंगाल तीन, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय मध्ये प्रत्येकी दोन, तर छत्तीसगढ, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार, जम्मू काश्मीर,

लक्षद्विप आणि पुदुच्चेरी इथल्या प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे. या जागांसाठी उमेदवारांना येत्या २७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी सुरू झाली. शरद पवार गटाच्या वतीनं विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी यांनी बाजू मांडताना,घड्याळ हे चिन्ह शरद पवार यांच्याकडे गेल्या पंचवीस वर्षांपासून असल्याचं नमूद करत, आता हे चिन्ह दुसरीकडे गेल्यास विशेषत: ग्रामीण भागातल्या मतदारांचा गोंधळ होऊन मतदानावर परिणाम होऊ शकतो, असा दावा केला. यावर न्यायालयानं, मतदार आता परिपक्व झाल्याचं मत नोंदवलं. दरम्यान, यासंदर्भातल्या याचिकांवर सुनावणी पूर्ण होऊन अंतिम आदेश येईपर्यंत पक्षाचं नाव आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवार गटाकडेच राहणार असून शरद पवार गटानं तुतारी हे चिन्ह वापरावं, असे आदेश न्यायालयानं दिले.घड्याळ हे चिन्ह अजित पवार गटाकडे असल्याची माहिती देणारी जाहिरात या गटानं प्रसिद्ध करावी, असे निर्देशही न्यायालयानं आज दिले.

****

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीनं आज पक्षाच्या जाहीरनाम्यावर चर्चा केली. या जाहीरनाम्यात शेतकरी, युवक, महिला, कष्टकरी आणि आरक्षण या मुद्द्यांवर भर दिला जाईल, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितलं.नवी दिल्लीत झालेल्या या बैठकीत पक्षाच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांच्यासह राहुल गांधी, प्रियंका गांधी, पी. चिदंबरम आणि अन्य ज्येष्ठ नेते सहभागी झाले होते.

****

काँग्रेसला राज्यात सात लोकसभा मतदारसंघामधे पाठिंबा देणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीनं म्हटलं आहे. विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना या अर्थाचं पत्र लिहिलं आहे. काँग्रेस लढवणार असणाऱ्या सात मतदार संघांची नावं आपल्याला कळवावीत, असं त्यांनी या पत्रात म्हटलं आहे. दरम्यान, आपल्या पक्षाला न बोलवता महाविकास आघाडीच्या बैठका

आणि चर्चा होत असून, ज्या बैठकांना बोलावलं त्या बैठकांमधे आमच्या प्रतिनिधीचं म्हणणं ऐकायला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं नकार दिला, त्यामुळे या पक्षांवरचा आपला विश्वास उडाल्याचं आंबेडकर यांनी या पत्रात म्हटलं आहे.

****

भाडोत्री हिंदुत्व आपल्याला मान्य नसल्याचं, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. यवतमाळ जिल्ह्यात उमरखेड इथं जनसंवाद मेळाव्यात ते बोलत  होते. या मेळाव्याला विधान परिषदेतले विरोधीपक्षनेते अंबादास दानवे, खासदार संजय राऊत, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अन्य पक्षांच्या नेत्यांवर ईडी सीबीआयची चौकशी लावणे म्हणजेच हुकूमशाही असल्याचं सांगत, शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करणं, मराठा आंदोलन, आदी मुद्यांवरूनही उद्धव ठाकरे यांनी भाजपवर टीका केली.

नांदेड इथंही ठाकरे यांनी संवाद मेळाव्याला संबोधित केलं. भाजपाला आता सत्तेचा हव्यास लागला असल्याची टीका ठाकरे यांनी यावेळी केली.

****

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांच्यासह भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते उपस्थित होते. मुख्यत: माढा लोकसभा मतदारसंघाच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. या मतदारसंघात यापूर्वीच भारतीय जनता पक्षाने विद्यमान खासदार रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

****

वरिष्ठ सनदी अधिकारी आणि राज्याचे साखर आयुक्त अनिल कवडे यांची राज्य सहकारी निवडणूक आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातल्या तरतुदीनुसार ही नियुक्ती केली आहे.दोन मे २०२४ पासून तीन वर्षांसाठी ही नियुक्ती आहे.

****

परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा २५ वा दीक्षांत समारंभ आज राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी ११ हजार दोन स्नातकांना विविध पदवी, पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. कृषी विद्यापीठाने संशोधनाच्या आधारे हवामान बदलास अनुरूप पीक पद्धती विकसित करावी, असं सांगतानाच राज्यपालांनी, कृषी पदवीधरांनी कृषि विकासात आपलं योगदान देण्याचा सल्ला दिला.

****

बहुचर्चित लखनभैया कथित बनावट चकमक प्रकरणात माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांची सत्र न्यायालयानं केलेली निर्दोष सुटका मुंबई उच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवत त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अठरा वर्षापूर्वीच्या या प्रकरणात सत्र न्यायालयानं २०१३ मध्ये बावीसपैकी एकवीस आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती तर शर्मा यांची निर्दोष सुटका केली होती. या प्रकरणातल्या इतर आरोपींची जन्मठेपही उच्च न्यायालयानं कायम ठेवली आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात अहेरी तालुक्यातल्या रेपनपल्ली नजीकच्या कोलामार्का जंगलात आज पहाटे पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. वर्गिस, मगटू, कुरसंग राजू आणि कुडीमेट्टा व्यंकटेश अशी मृत नक्षल्यांची नावं असून, चारही जण तेलंगणा राज्यातले आहेत. त्यांच्यावर एकूण ३६ लाखांचं बक्षीस होतं. पोलिसांनी घटनास्थळाहून एक एके 47, एक कार्बाइन, देशी बनावटीची दोन पिस्तुलं, तसंच इतर साहित्य ताब्यात घेतलं. या परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

****

मतदानाची कमी होणारी टक्केवारी ही चिंतेची बाब असल्याचं, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते. आगामी निवडणुकीत सर्व मतदारांनी मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं. जिल्ह्यातली निवडणूक व्यवस्था, मतदान केंद्रांवरच्या सुविधा, आदर्श आचारसंहितेचं पालन, यासह विविध मुद्यांबाबत जिल्हाधिकारी स्वामी यांनी या मुलाखतीत सविस्तर माहिती दिली. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी घेतलेली ही मुलाखत उद्या बुधवारी सकाळी

साडेदहा वाजता आमच्या केंद्रावरून प्रसारित होईल. एआयआर छत्रपती संभाजीनगर या युट्यूब चॅनलवरही श्रोत्यांना ही मुलाखत ऐकता येईल.

****

राज्याच्या दुष्काळग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या राज्यसरकारनं घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी नुकताच छत्रपती संभाजीनगर महसूल विभागाचा दुष्काळाविषयी आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला दुष्काळग्रस्त भागातल्या शालेय व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत निर्देश दिले होते. यानुसार विद्यापीठानं आता परीक्षेसाठी अर्ज केलेल्या आणि या निर्णयानुसार शुल्कमाफीला पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती शैक्षणिक संस्थांकडून मागवली आहे, दुष्काळग्रस्त भागातला एकही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना शैक्षणिक संस्थांना दिल्या आहेत.

****